नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/१२/२०२५ (गुरूवार )

## नगरपरिषद सावनेर सार्वत्रिक निवडणूक २०२५ मतमोजनी सावनेर नगरपरीषद येथे पार पडणार असुन उमेदवारांना/प्रतिनिर्धींना ओळखपत्र अनिवार्य

नगरपरिषद सावनेर सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता ०२/१२/२०२५ रोजी एकूण ३९ मतदान केंद्रावर ११ प्रभागांकरिता एक नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदा करिता मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मतमोजणी २१/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून होणार आहे . त्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अक्षय पोयाम , सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती. अर्शिया जुही यांनी दिलेल्या माहितीनुसार नगरपरिषद सावनेर, नगरभवन कार्यालय या ठिकाणी मतमोजणी सुरू होणार आहे. मत मोजणी करीता एकूण ८ टेबल ठेवण्यात आले आहे. मतमोजणी ही ५ फेऱ्यांमध्ये होणार आहे. त्याकरिता एकूण ३० ते ३५ अधिकारी/कर्मचारी उपस्थित असतील. प्रत्येक उमेदवारास एका बुथ करिता एक प्रतिनिधी ठेवण्याची मुभा असल्यामुळे त्या अनुषंगाने प्रत्येक उमेदवाराने मतमोजणी प्रतिनिधीचे ओळखपत्र तयार करून घेण्याकरिता आवश्यक कागदपत्रांसोबत नगरपरिषद सावनेर या ठिकाणी भेट देऊन ओळखपत्र बनवून घ्यावे. ओळखपत्राशिवाय मतमोजणीच्या ठिकाणी कोणताही उमेदवार अथवा मतमोजणी प्रतिनिधीला उपस्थित राहता येणार नाही. मोजणीच्या वेळी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार नागरिकांनी मतमोजणीच्या कालावधीत शांतता व शिस्त राखून कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलीस प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.


नगर भवन
नगर परिषद सावनेर

# पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत टेकाडी येथील रेनबो हॉटेल मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, १ आरोपी अटक

# अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण आणि कन्हान पोलीस यांची संयुक्त कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक १७/१२/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, कन्हान अंतर्गत मौजा टेकाडी ,मनसर रोड येथील रोड लगत असलेल्या रेनबो लॉजिंग बोंर्डीग ॲड रेस्टॉरन्ट येथे महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करून घेत आहे. नमुद पथकाने सदर माहीती कन्हान पोलीसांना देत कन्हान पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई केली. पोलीसांनी मौजा टेकाडी येथील रेनबो लॉजिंग बोंर्डीग ॲड रेस्टॉरन्ट येथे धाड टाकली असता आरोपी गौरव दिलीप सहारे , वय २० वर्ष, रा. टेकाडी, कन्हान, ता. पारशिवणी हॉटेल मध्ये मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता तो हॉटेल चा मॅनेजर असल्याची माहीती मिळाली. हॉटेल मालकाचे नाव आरोपी क्रं २ मनोहर चिरकुट हुड, रा टेकाडी असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेल ची पाहणी केली असता नमुद हॉटेल मध्ये खोली क्रं १०२ मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. आरोपी हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली . पोलीसांनी घटनास्थळावरून २ ॲड्रॉईड मोबाईलसह , रोख रक्कम १,००० /— रूपये, आणि इतर साहीत्य असा एकुण २०,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे.

**नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, कलम १४३, ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्रं १ याला अटक करण्यात आली आहे. दिनांक १९/१२/२०२५ रोजी पर्यंत आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.**


रेनबो लॉज & रेस्टॉरंट ढाबा

## घरफोडीचे ३ गुन्हे उघड, १ आरोपी अटक
## परशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :– पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत दिनांक ११/०८/२०२५ रोजी वेटरनरी दवाखाना, पारशिवणी येथे आत प्रवेश करून अज्ञात चोरटयांनी चोरी (घरफोडी) केल्याबाबत गुन्हा नोंद आहे. दिनांक २५/११/२०२५ रोजी मौजा नायाकुंड येथे फिर्यादी सौ दर्शना उके यांच्या घरचे कुलुप तोडुन अज्ञात चोरटयांनी घरफोडी केली होती.तसेच दिनांक २५/११/२०२५ रोजी मौजा पालोरा येथे फिर्यादी घनश्याम पोटभरे यांचे घरी सुध्दा तोडुन अज्ञात चोरटयांनी घरफोडी करून घरातील ऐवज चोरी केला होता.सदर प्रकरणी पारशिवणी पोलीस स्टेशन येथे घरफोडी च्या कलमान्वये गुन्हे नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पारशिवणी पोलीसांनी गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक १६/१२/२०२५ रोजी आरोपी नामे अजय रामदास पाल, वय २० वर्षे, रा. आंबेडकर नगर, मनसर, ता रामटेक यास मनसर येथुन ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे पोलीसांनी सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने त्याचा साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालक याच्यासोबत वर नमुद तिन्ही ठिकाणी घरफोडी करून ऐवज चोरी केल्याबाबत कबुली दिली. पारशिवणी पोलीसांनी नमुद आरोपीस अटक करून नमुद आरोपीतांकडुन गुन्हयात चोरीस गेलाला मुद्देमाल रोख रक्कम ७,०००/– रूपये, सोन्याचे मणी आणि इतर चोरीस गेलेले साहीत्य एकुण १५,२००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक १७/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ३ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १९८० मिली देशी दारु, १० लीटर मोहाफुल दारू असा एकुण १३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १७/१२/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १८/१२/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार,जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी करून संशयीत वाहनांना तपासण्यात आले.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री पराग पोटे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकचे पोलीस अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने